RNI No. MAHBIL /2009/31748

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—अ-मध्य उप-विभाग

वर्ष ४, अंक ३१(१२)] शनिवार, जून ३०, २०१८/आषाढ ९, शके १९४० [पृष्ठे ४, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ५३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

**नगरविकास विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० जून २०१८

**अधिसूचना**

**ध्वनी प्रदूषण (नियमन आणि नियंत्रण) नियम, २०००.**

क्रमांक संकिर्ण. २०१८/प्र.क्र. ५६/नवि-१७.—ज्याअर्थी, पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ च्या (१९८६ चा २९) कलम ३, ६ आणि २५ सह पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ च्या कलम ५ अनुसार प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून केंद्र शासनाने ध्वनी प्रदूषण (नियमन आणि नियंत्रण) नियम, २००० तयार केले आहेत (यापुढे ज्याचा उल्लेख " मुख्य नियम " असा करण्यात आला आहे.) ;

आणि ज्याअर्थी, मुख्य नियमांच्या नियम ३ च्या पोट-नियम (२) अन्वये विविध क्षेत्रांकरिता ध्वनी मानकांच्या प्रयोजनासाठी औद्योगिक, व्यावसायिक, निवासी व शांतता क्षेत्र असे वर्गीकरण करण्याचे अधिकार राज्य शासनास प्रदान करण्यात आले आहेत आणि ध्वनी प्रदूषण (नियमन आणि नियंत्रण) (सुधारणा) नियम, २०१७ नुसार मुख्य अधिनियमाच्या नियम ३ च्या पोट-नियम ३ मध्ये नव्याने समाविष्ट केलेल्या परंतुकानुसार राज्य शासनाने, उक्त नियम ३ च्या पोट-नियम २ मधील तरतुदीनुसार अधिसूचीत केल्याशिवाय कोणतेही क्षेत्र शांतता क्षेत्र या वर्गीकरणात समाविष्ट होणार नाही ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाने शासन निर्णय क्र. ध्वनीप्र-२००९/प्र.क्र. १२/८/(भाग-२)/तां.क. १, दिनांक २० नोव्हेंबर २०१७ अन्वये संबंधित प्रशासकीय विभागांना मुख्य नियमांच्या प्रयोजनार्थ त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील स्थानिक नियोजन प्राधिकरण/स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये शांतता क्षेत्र अधिसूचीत करण्याचे निदेश दिले आहेत ;

त्याअर्थी, आता मुख्य नियमांच्या नियम ३ च्या पोट-नियम (५) चे परंतुक व पोट-नियम (२) अनुसार प्रदान केलेल्या अधिकारांचा, तसेच राज्य शासनास यासंबंधात सक्षम करणाऱ्या अन्य सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे, सोबतच्या परिशिष्टात नमूद केलेली क्षेत्रे, ध्वनी मानकांच्या प्रयोजनांसाठी मुख्य नियमांमधील विहित तरतुदीनुसार औद्योगिक, वाणिज्यिक, रहिवास किंवा शांतता क्षेत्र म्हणून वर्गीकृत करत असल्याचे अधिसूचीत करण्यात येत आहे.

## परिशिष्ट

## ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीत असलेले क्षेत्र

| अ.क्र. | परिसर /इमारत यांचा तपशील | मुख्य नियमांच्या हेतूसाठी क्षेत्र / विभाग वर्गीकरण (अ) औद्योगिक क्षेत्र/विभाग ; (ब) वाणिज्यिक क्षेत्र/विभाग ; (क) रहिवास क्षेत्र/विभाग ; किंवा (ड) शांतता क्षेत्र/विभाग. |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | कामगार रुग्णालय, वागळे इस्टेट, ठाणे (प) - ४०० ६०४. | शांतता |
| २ | बेथनी हॉस्पिटल, पोखरण रोड नं.२, मां निकेतन समोर, ठाणे (प) - ४०० ६०६. | औद्योगिक |
| ३ | वेदांत हॉस्पिटल वेन्चर ऑफ श्री विघ्नहर्ता हेल्थकेअर, सर्वे नं.९३, ओवळा, ठाणे - ४०० ६०७. | रहिवासी |
| ४ | सफायर हॉस्पिटल, कावेरी हाईट, जुना म्हात्रे तलावासमोर, प्रेम नगर, खारेगांव - ४०० ६०५. | रहिवासी |
| ५ | ज्युपिटर लाईफलाईन हॉस्पिटल्स लि., पूर्व द्रुतगती महामार्ग, वोल्टास लि. जवळ, ठाणे (प.) - ४०० ६०६. | औद्योगिक |
| ६ | ठाणे महानगरपालिकेचे छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, कळवा, ठाणे - ४०० ६०५. | शांतता |
| ७ | जिल्हा सामान्य रुग्णालय, उथळसर, ठाणे - ४०० ६०१. | शांतता |
| ८ | सेंट जॉन बाप्टिस्ट हायस्कूल, जांभळी नाका, ठाणे - ४०० ६०२. | शांतता |
| ९ | माजिवडा ग्रामीण शिक्षण संस्थेचे मराठी/हिंदी/इंग्लिश हायस्कूल, माजिवडा गांव, ठाणे - ४०० ६०१. | रहिवासी |
| १० | ज्ञानसाधना कनिष्ठ महाविद्यालय, परबवाडी, ठाणे - ४०० ६०४. | शांतता |
| ११ | एम.एच. मराठी हायस्कूल, शिवाजी पथ, नौपाडा, ठाणे - ४०० ६०१. | शांतता |
| १२ | ज्ञानोदय माध्यमिक हिंदी विद्यालय, सावरकर नगर, ठाणे - ४०० ६०४. | औद्योगिक |
| १३ | अल-नदी-उल-फलाह इंग्लिश स्कूल, कौसा, मुंब्रा - ४०० ६१२. | रहिवासी |
| १४ | अब्दुल्ला पटेल हायस्कूल अँण्ड ज्युनियर कॉलेज, नागसेन नगर, किस्मत कॉलनीजवळ, मुंब्रा - ४०० ६१२. | रहिवासी |
| १५ | न्यू हॉरिझोन स्कॉलर्स स्कूल, कावेसर, ठाणे - ४०० ६०७. | शांतता |
| १६ | भारतरत्न इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालय, सावरकर नगर, ठाणे - ४०० ६०६. | शांतता |
| १७ | सेंट झेवियर्स इंग्लिश माध्यमिक विद्यालय, पातलीपाडा, ठाणे - ४०० ६०७. | रहिवासी |
| १८ | हिरानंदानी फाऊंडेशन स्कूल, हिरानंदानी इस्टेट, ठाणे - ४०० ६०७. | रहिवासी |
| १९ | लिटल फ्लॉवर इंग्लिश स्कूल, वर्तकनगर, ठाणे - ४०० ६०६. | शांतता |
| २० | वसंत विहार इंग्लिश हायस्कूल, वसंत विहार, ठाणे - ४०० ६१०. | शांतता |
| २१ | सिंघानिया स्कूल अँण्ड ज्युनियर कॉलेज, पोखरण रोड नं.१, ठाणे - ४०० ६०६. | शांतता |
| २२ | डी.ए.व्ही. पब्लिक स्कूल, तत्वज्ञान विद्यापीठासमोर, ठाणे (प.) - ४०० ६०६. | शांतता |
| २३ | जन विकास संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल, कळवा, ठाणे - ४०० ६०५. | शांतता |
| २४ | विद्या प्रसारक मंडळाचे जोशी-बेडेकर महाविद्यालय, सिडको स्टॉप जवळ, ठाणे - ४०० ६०१. | शांतता |
| २५ | ठाणे महानगरपालिका शाळा क्र. ३१/४०, शिमला पार्क, कौसा, मुंब्रा - ४०० ६१२. | शांतता |
| २६ | ठाणे जिल्हा व सत्र न्यायालय कोर्ट नाका, ठाणे - ४०० ६०१. | शांतता |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**कैलास बधान,**
शासनाचे उप सचिव.